THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

SATURDAY, 18TH FEBRUARY 1893.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**मलिका मोआझमा महाराणी व्हिक्टोरिया, हल्लींच्या राणी साहेब, यांनीं सर दिनशा माणेकजी पेटिट यांना, त्यांच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतीपर्यंत व त्या मुदतींत, धारण करण्यासाठीं, आणि त्यांच्या मरणापासून व त्यांच्या मरणोत्तर लगेच त्यांचे द्वितीय पुत्र फ्रामजी दिनशा पेटिट, एस्क्वायर, यांनीं व त्यांच्या औरस पुरुष वारसांनीं आणि अशी औरस संतति न राहिल्यास सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या औरस पुरुष वारसांनीं, धारण करण्यासाठीं नुक्ताच दिलेला बारोनेटचा किताब व पदवी हीं जोंपर्यंत चालू राहतील तोंपर्यंत सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट, बारोनेट, यांची मिळकत, ह्मणजे, एक लक्ष पंचवीस हजार रुपयांच्या सालीना उत्पन्नाचे मुंबई शहरच्या म्युनिसिपल कार्पोरेशनचे बॉण्ड आणि मुंबई बेटांतील "पेटिट हाल" या नांवाचें म्यान्शन-हौस व जमीनजुमला हीं चालू राहून त्यांच्या आधारावर तो किताब व पदवी हीं चालावीं या हेतूनें सदर्हू बॉण्ड वगैरे मिळकत नियुक्त करण्यासाठीं व तत्संबंधीं इतर कारणासाठीं आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थी मलिका मोआझमा महाराणी व्हिक्टोरिया, परमेश्वराच्या कृपेनें ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याच्या राणीसाहेब व डिफेन्डर ऑफ् धि फेथ, यांनीं आपल्या राज्यकारकीर्दीच्या चौपन्नाव्या वर्षाच्या सेप्टेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस किंवा त्या तारखेच्या सुमारास वेस्टमिन्स्टर मुक्कामीं बादशाही सनद देऊन आणि आपल्या स्वदस्तूरचें वारंट देऊन असें जाहीर केलें आहे कीं आह्मीं आमच्या विशेष कृपेस्तव, विशेष परिज्ञानामुळें व केवळ स्वइच्छेनें, आमच्या विश्वासांतील व विशेष लोभांतील सर दिनशा माणेकजी पेटिट, नैट, राहणार मुंबई बेटांतील "पेटिट हाल," यांस बारोनेटच्या पदवीस, स्थितीस व दरजास चढविलें आहे, नेमिलें आहे व आणिलें आहे, आणि त्यांस ह्मणजे सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांस आह्मी आमच्यातर्फे, आमच्या वारसांतर्फे व स्थानापन्नातर्फे सदर्हू बादशाही सनदेवरून ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याचे बारोनेट, त्यांच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतीपर्यंत व त्या मुदतींत, केलें, नेमिलें, व बनविलें असून हा बारोनेटचा किताब त्यांनीं, व त्यांच्या मरणापासून व त्यांच्या मरणोत्तर लगेच त्यांचे द्वितीय पुत्र फ्रामजी दिनशा पेटिट,

एस्कायर, यांनीं व त्यांच्या असलेल्या व होतील त्या औरस पुरुष वारसांनीं, आणि अशी संतति न राहिल्यास, सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या असलेल्या व होतील त्या औरस पुरुष वारसांनीं धारण करावयाचा आहे ;

आणि ज्या अर्थी मलिका मआझमांच्या सरकाराशीं त्या बाबतींत केलेला करार पुरा करण्यासाठीं सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांची अशी इच्छा आहे कीं आपल्याला, आणि सदर्हू बारोनेटची पदवी ज्यांना प्राप्त होईल ते सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट आणि अनुक्रमें आपले व सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांचे औरस पुरुष वारस यांना सदरीं सांगितल्याप्रमाणें देण्यांत आलेल्या किताबाची पदवी जिच्या आधारावर चालू राहील अशी वाजवी मिळकत आपल्या स्वतःच्या आणि सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट वगैरे सदरीं सांगितल्या प्रकारच्या वारसांच्या संबंधानें निरंतरची नियुक्त करावी;

आणि ज्या अर्थी सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचें मुंबई बेटांत "पेटिट हॉल" या नांवाचें म्यान्शन-हौस व जमीनजुमला असून त्यांत त्यांचा वंशपरंपरागत अप्रातिबंध हक्कसंबंध आहे, आणि त्यांची अशी इच्छा आहे कीं सदरीं सांगितलेला करार पुरा करण्यासाठीं अनुक्रमें एक लक्ष पंचवीस हजार रुपयांच्या सालीना उत्पन्नाचे मुंबई शहरच्या म्युनिसिपल कार्पोरेशनचे बॉण्ड किंवा डिबेन्चर आणि सदर्हू म्यान्शन-हौस व जमीनजुमला यांच्या संबंधानें जे उपयोग, जे जिम्मे व जीं कारणें या आक्टांत पुढें परिमित केलीं आहेत व ठरविलीं आहेत त्या उपयोगांप्रीत्यर्थ, त्या जिम्म्यांवर व त्या कारणांसाठीं ते बॉण्ड किंवा डिबेन्चर आणि सदर्हू म्यान्शन-हौस व जमीनजुमला हीं नियुक्त करावीं;

आणि ज्या अर्थी सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांची अशीहि इच्छा आहे कीं, सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट व त्यांचे औरस पुरुष वारस आणि तसेच सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचे औरस पुरुष वारस यांच्यांतून ज्यांना ज्यांना सदर्हू बारोनेटचा किताब व पदवी हीं प्राप्त होतील त्यांनीं त्यांनीं, सदर्हू किताब व पदवी हीं त्यांना प्राप्त होतील त्या वेळीं, सदर्हू किताब व पदवी त्यांना प्राप्त होतेवेळीं जें जें कोणतेंहि नांव किंवा जीं जीं कोणतींहि नांवें ते धारण करीत असतील त्या त्या नांवाच्या किंवा नांवांच्या ऐवजीं "दिनशा माणेकजी पेटिट" हें नांव घ्यावें व धारण करावें ; व ज्या अर्थी त्यांची अशीहि इच्छा आहे कीं मुंबईचे अकौण्टण्ट जनरल, मुंबईचे कलेक्टर, आणि मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी म्याजिस्ट्रेट, या सर्वांनीं विवक्षित काळीं, सदरीं सांगितलेल्या म्युनिसिपल बॉण्डाच्या आणि म्यान्शन-हौस व जमीनजुमला यांच्या संबंधानें ट्रस्टी होऊन, त्याच प्रकारें त्या सिक्यूरिटींच्या संबंधाचे व तें म्यान्शन-हौस व जमीनजुमला यांच्याहि संबंधाचे या आक्टाचे साधारण हेतु सिद्धीस नेण्यासाठीं व या आक्टावरून दिलेले अधिकार बजाविण्यासाठींहि ट्रस्टी व्हावें ;

आणि ज्या अर्थी सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांची अशी इच्छा आहे कीं, आपण, सदर्हू बारोनेटच्या किताबाची पदवी चालू रहाण्याच्या कारणासाठीं, सदर्हू बॉण्ड आणि सदर्हू म्यान्शन-हौस व जमीनजुमला यां या संबंधानें जे उपयोग, जे जिम्मे व जीं कारणें या आक्टांत पुढें परिमित केलीं आहेत व ठरविलीं आहेत त्या उपयोगांप्रीत्यर्थ, त्या जिम्म्यांवर व त्या कारणांसाठीं ते बॉण्ड व तें म्यान्शन-हौस व जमीनजुमला हीं सदर्हूप्रमाणें नियुक्त करण्याचें कबूल केल्याप्रमाणें नियुक्त करावीं ;

आणि ज्या अर्थी सदर्हू हेतु गव्हर्नर जनरल यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाच्या आक्टाच्या द्वारें सिद्धीस नेणें योग्य आहे ;

त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

ट्रस्टींची संस्थापना.

१. आर्थर फ्रेडरिक कॉक्स, एस्क्वायर, मुंबईचे अकौण्टण्ट जनरल, जेम्स माकनाब् काम्पबेल, एस्क्वायर, मुंबईचे कलेक्टर, व चार्लस फिलिप कूपर, एस्क्वायर, मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी म्याजिस्ट्रेट, आणि त्यांचे त्यांचे स्थानापन्न, ह्मणजे, जे कोणी विवक्षित काळीं मुंबईचे अकौण्टण्ट जनरल, मुंबईचे कलेक्टर व मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी म्याजिस्ट्रेट असतील त्यांची " धि ट्रस्टीज् ऑफ धि दिनशा माणेकजी पेटिट बारोनेटसी " या नांवाची व हुद्याची एक संस्थापित मंडळी असेल व त्यांना या आक्टावरून सदर्हू नांवाची व हुद्याची संस्थापित मंडळी ह्मणून नेमिलें आहे, आणि त्यांना निरंतरचें स्थानापन्नत्व व सामायिक शिक्का हीं असतील; आणि सदर्हू आर्थर फ्रेडरिक कॉक्स, जेम्स माकनाब् काम्पबेल व चार्लस फिलिप कूपर, आणि त्यांचे त्यांचे सदर्हू स्थानापन्न ( ज्यांना या आक्टांत पुढें " संस्थापित मंडळी " असें ह्मटलें आहे ) हे, अशी संस्थापित मंडळी या नात्यानें, या आक्टावरून दिलेले अधिकार बजाविण्यासाठीं व या आक्टाचे हेतु सिद्धीस नेण्यासाठीं ट्रस्टी असतील व त्यांना या आक्टावरून तसे ट्रस्टी नेमिलें आहे.

सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या वारसांनीं त्यांचें नांव घेणें.

२. सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट व त्यांचे औरस पुरुष वारस आणि सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचे इतर सर्व औरस पुरुष वारस यांच्यांतून, सदर्हू पदवी देण्यांत आलेल्या सनदेंतील अटींअन्वयें ज्याला ज्याला सदर्हू किताब व पदवी हीं प्राप्त होतील त्यानें त्यानें इतर कोणत्याहि नांवाच्या किंवा नांवांच्या ऐवजीं व बदला "दिनशा माणेकजी पेटिट" हें नांव आपल्याला घेतलें पाहिजे; आणि सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट व तसेच त्यांचे सदर्हू प्रकारचे औरस पुरुष वारस आणि सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचे सदर्हू प्रकारचे इतर सर्व औरस पुरुष वारस यांना व्यक्तिशः व परंपरेनें " दिनशा माणेकजी पेटिट " हें नांव दिलें पाहिजे व त्यांनीं हरेक प्रसंगीं " दिनशा माणेकजी पेटिट " हें नांव अनुक्रमें आपलें आहे असें सांगितलें पाहिजे, आपल्याला घेतलें पाहिजे व त्या नांवानें आपली सही केली पाहिजे.

एस्टेटीचें उत्पन्न नांवावर करून देणें व त्याचा विनियोग करणें.

३. हा आक्ट ठरल्यापासून व ठरल्यानंतर लगेच, एक लक्ष पंचवीस हजार रुपयांहून कमी नाहीं इतक्या सालीना उत्पन्नाचे मुंबई शहरच्या म्युनिसिपल कार्पोरेशनचे बॉण्ड सदर्हू संस्थापित मंडळीच्या नांवावर करून दिले पाहिजेत; आणि त्या बॉण्डांच्या संबंधानें यांत पुढें निर्दिष्ट केलेल्या जिम्म्यांवर व कारणांसाठीं सदर्हू संस्थापित मंडळीनें ते धारण केले पाहिजेत, ( ह्मणजे ), सदर्हू संस्थापित मंडळीनें, सदर्हू बांण्डाच्या ऐवजाची मुंबई शहरच्या म्युनिसिपल कार्पोरेशनकडून फेड होईपर्यंत किंवा ते विकावे असें सदर्हू ट्रस्टींच्या नजरेस येऊन त्यांजकडून ते विकले जात तोंपर्यंत, ते जिम्म्यांवर धारण करण्याचें चालू ठेवून, सदर्हूप्रमाणें फेड किंवा विक्री झाली असतां त्या फेडीच्या किंवा विक्रीच्या वेळीं जी रकम येईल ती, ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याच्या सरकारचे किंवा हिंदुस्थान सरकारचे, अगर त्यांपैकीं कोणत्याहि एका सरकारानें ज्यांच्या मुदलाची अगर व्याजाची हमी दिलेली असेल तसे कोणतेहि स्टॉक, फण्ड, अगर सिक्यूरिटी घेण्याच्या कामीं लाविली पाहिजे, व त्याच रीतीनें, जरूर पडेल त्याप्रमाणें वारंवार, असे स्टॉक, फंड किंवा सिक्यूरिटी, तशाच किंवा त्यासारख्याच प्रकारच्या दुसऱ्या स्टॉकांच्या, फंडांच्या किंवा सिक्यूरिटींच्या ऐवजीं बदलण्याचें, फिरविण्याचें व पालटण्याचें चालू ठेविलें पाहिजे; आणि याशिवाय सदर्हू संस्थापित मंडळीनें वेळोवेळीं जिम्म्यांवर, सदर्हू बॉण्डांचें, स्टॉकांचें, फंडाचें व सिक्यूरिटींचें डिव्हिडण्ड, व्याज व सालीना उत्पन्न हीं सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतींत त्यांच्या फायद्याकडे व फायद्यासाठीं; आणि सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या मरणोत्तर सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट हे जिवंत राहिल्यास, सदर्हू दिनशा माणेकजी पेटिट यांच्या मरणापासून व मरणोत्तर लगेच सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतींत त्यांच्या फायद्यासाठीं; आणि त्यांच्यांतून

ह्मणजे सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट व फ्रामजी दिनशा पेटिट यांच्यांतून जो कोणी मागें जिवंत राहील त्याच्या मरणापासून व मरणोत्तर लगेच, कायद्याचा कोणताहि नियम किंवा न्यायनीति तसें होण्यास विरुद्ध असली तथापि, प्रसंगानुसार सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांचा किंवा सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचा औरस पुरुष वारस या नात्यानें, सदर्हू बादशाही सनदेवरून सदरीं सांगितल्याप्रमाणें दिलेला किताब विवक्षित काळीं प्राप्त होऊन त्या किताबाचा उपभोग घेत असलेल्या मनुष्याच्या फायद्यासाठीं दिलीं पाहिजेत व लाविलीं पाहिजेत; आणि सदर्हू संस्थापित मंडळीनें, सदर्हू बारोनेटचा किताब व पदवी हीं ज्यास प्राप्त व्हावयाचीं असा कोणी सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांचा किंवा सर दिनशा माणेकजी पेटिट यांचा औरस पुरुष वारस नसल्यास व नाहींसा झाल्यास सदर्हू बॉण्ड सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट, त्यांचे वहिवाटदार, आर्डमिनिस्ट्रेटर व असैनी यांसाठीं जिम्म्यावर धारण केले पाहिजेत; आणि शेवटचा शेषाधिकार किंवा उत्तराधिकार, सदर्हू बारोनेटचा किताब व पदवी हीं चालू राहतील त्या मुदतींत व सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचा औरस पुरुष वारस सदरीं सांगितल्याप्रमाणें आतां कोणी नाहीं असें होई तोंपर्यंत कोणत्याहि वेळीं सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट, त्यांचे वहिवाटदार, आडमिनिस्ट्रेटर व असैनी हे, लेख किंवा मृत्युपत्र किंवा इतर अभयपत्र अगर अभयपत्रें करून कायदेशीर रीतीनें लावून देण्यास, नांवावर करून देण्यास, देण्यास व त्याची व्यवस्था करण्यास मुखत्यार आहेत.

अल्पवयाच्या मुदतींत उत्पन्नाचा विनियोग.

४. सदर्हू बादशाही सनदेच्या अटींअन्वयें विवक्षित काळीं सदर्हू बारोनेटच्या पदवीवर हक्क असून त्या पदवीचा उपभोग घेत असलेला कोणताहि मनुष्य अल्पवयी असल्यास त्याच्या अल्पवयाच्या मुदतींत सदर्हू संस्थापित मंडळीस आपल्या नजरेप्रमाणें योग्य वाटेल तेवढाच सदर्हू ट्रस्ट फंडांच्या सालीना व्याजाचा, डिव्हिडण्डाचा व उत्पन्नाचा आणि सदर्हू ठिकाणांच्या उत्पन्नाचा भाग अशा बारोनेटच्या सदरीं सांगितल्या प्रकारच्या अल्पवयाच्या मुदतींतील प्रत्येक वर्षी त्याचें पाळणपोषण, विद्याभ्यास व फायदा यांसाठीं व यांप्रीत्यर्थ सदर्हू संस्थापित मंडळीनें दिला व लाविला पाहिजे; आणि त्या मंडळीनें वेळोवेळीं, सदर्हू ट्रस्ट फंडांच्या सदर्हू सालीना डिव्हिडण्डांचा, व्याजाचा व उत्पन्नाचा व सदर्हू ठिकाणांच्या उत्पन्नाचा बाकी राहील तो भाग, ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याच्या सरकारचे किंवा हिंदुस्तान सरकारचे, अथवा त्यांपैकीं कोणत्याहि एका सरकारानें ज्यांच्या मुदलाची अगर व्याजाची हमी दिलेली असेल तसे, स्टॉक, फण्ड व सिक्यूरिटी घेण्यांत लाविला पाहिजे, आणि असा बारोनेट वयांत आला ह्मणजे सदर्हूप्रमाणें लाविलेला पैसा व तत्संबंधी सांचलेली सर्व रकम हीं त्याला, किंवा तो फर्मावील त्याप्रमाणें, व निखालस त्याच्याच फायद्यासाठीं दिलीं पाहिजेत, नांवावर करून दिलीं पाहिजेत व लावून दिलीं पाहिजेत.

म्यान्शन-हौस जो कोणी विवक्षित काळीं बारोनेट असल त्याच्याच उपयोगास लावणें.

५. सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांनीं आपणासाठीं व आपल्या वारसांसाठीं ह्मणून धारण केलेलें मुंबई बेटांतील "पेटिट हॉल" या नांवाचें म्यान्शन-हौस व जमीनजुमला हीं तत्संबंधी हक्कांसहित, अंगांसहित व उपांगांसहित, यांत पुढें ठरविलेल्या जिम्म्यांवर, हा आक्ट ठरल्यापासून व ठरल्यानंतर लगेच, ह्या आक्टाच्या अमलबजावणीवरून सदर्हू संस्थापित मंडळीच्या उपयोगांत व उपयोगासाठीं राहिलीं पाहिजेत, (ह्मणजे), जिम्म्यावर, सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतीपर्यंत व त्या मुदतींत त्यांच्यासाठीं; आणि सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या मरणोत्तर सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट हे जिवंत राहिल्यास, सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या मरणापासून व मरणोत्तर लगेच, जिम्म्यावर, सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतीपर्यंत व त्या मुदतींत त्यां-

त्यासाठीं ; आणि त्यांच्यांतून ह्मणजे सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट व फ्रामजी दिनशा पेटिट यांच्यांतून जो कोणी मागें जिवंत राहील त्याच्या मरणापासून व मरणोत्तर लगेच जिम्म्यावर, सदहू फ्रामजी दिनशा पेटिट यांच्या ज्या औरस पुरुष वारसांस सदहू बादशाही सनदेवरून दिलेला बारोनेटचा किताब सदरीं सांगितल्याप्रमाणें प्राप्त होईल त्यांच्यासाठीं ; आणि सदहू फ्रामजी दिनशा पेटिट यांच्या ज्या औरस पुरुष वारसांस सदहू बारोनेटचा किताब व पदवी हीं सदरीं सांगितल्याप्रमाणें प्राप्त व्हावयाचीं असे कोणी वारस नसल्यास व नाहींसे झाल्यास, जिम्म्यावर, सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या ज्या औरस पुरुष वारसांस सदहू किताब प्राप्त होईल त्यांच्यासाठीं ; आणि असे शेवटीं सांगितल्याप्रकारचे कोणी औरस पुरुष वारस नसल्यास व नाहींसे झाल्यास, निरंतर रीतीनें सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट आणि त्यांचे वारस व असैनी यांच्यासाठीं सदहूप्रमाणें राहिलीं पाहिजेत ; आणि शेवटचा शेषाधिकार किंवा उत्तराधिकार, सदहू बारोनेटचा किताब व पदवी हीं चालू राहतील त्या मुदतींत व सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचा औरस पुरुष वारस सदरीं सांगितल्याप्रमाणें आतां कोणी नाहीं असें होई तोंपर्यंत कोणत्याहि वेळीं सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट आणि त्यांचे वारस व असैनी हे, जेणेंकरून तो शेषाधिकार किंवा उत्तराधिकार ब्रिटिश इंडियाचे रहिवाशी असलेल्या पारशी लोकांस कायद्याप्रमाणें हस्तगत करतां येईल किंवा त्याची त्यांना कायद्याप्रमाणें व्यवस्था करतां येईल, असा लेख किंवा मृत्युपत्र किंवा दुसरें कोणतेंहि अभयपत्र अगर दुसरीं कोणतींहि अभयपत्रें करून, देण्यास, परहस्तगत करण्यास, व त्यांची व्यवस्था करण्यास मुखत्यार आहेत.

६. मात्र असें ठरविलें आहे कीं हमेश, ज्या कोणत्याहि मनुष्यास विवक्षित काळीं सदहू बारोनेटची पदवी प्राप्त झाली असेल त्या मनुष्यास सदहू स्टॉकांचें, फंडांचें व सिक्युरिटींचें डिव्हिडण्ड, व्याज व उत्पन्न घेण्याचा किंवा सदहू जमीनजुमला कबज्यांत ठेवण्याचा अगर त्याचीं भाडीं व फायदे घेण्याचा या आक्टाप्रवें हक्क प्राप्त झाल्यानंतर सगळ्या एका वर्षाच्या मुदतीपर्यंत, किंवा सदहू पदवी प्राप्त झाली त्यावेळीं तो मनुष्य अल्पवयी असल्यास तो एकवीस वर्षांच्या वयाचा झाल्यानंतर सगळ्या एका वर्षाच्या मुदतीपर्यंत, तो मनुष्य यांत पूर्वीं ठरविल्याप्रमाणें "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा उपयोग करण्यास नाकारील किंवा हयगय करील तर, किंवा, अशा कोणत्याहि मनुष्यानें त्या नांवाचा सदहूप्रमाणें उपयोग केला असून तो मनुष्य आपल्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतींत लागोपाठ साहा क्यालेंडर महिन्यांच्या मुदतीपर्यंत त्या नांवाचा सदहूप्रमाणें उपयोग करण्याचें बंद करील तर, सदहू कोणत्याहि एका किंवा दोन्ही प्रसंगीं सदहू "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा उपयोग करण्यास सदहूप्रमाणें नाकारणाऱ्या किंवा हयगय करणाऱ्या, अगर त्या नांवाचा उपयोग केला असून त्याचा उपयोग करण्याचें सदहूप्रमाणें बंद करणाऱ्या मनुष्याचा सदहू ट्रस्ट फंडांतील व ठिकाणांतील हक्कसंबंध किंवा हितसंबंध त्याच्या बाकी राहिलेल्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतींत तहकूब केला जाईल; आणि याप्रमाणें तहकूब केल्याच्या कोणत्याहि व प्रत्येक मुदतींत, सदहू स्टॉकांचें, फंडांचें व सिक्युरिटींचें डिव्हिडण्ड, व्याज व उत्पन्न हीं, आणि सदहू जमीनजुमल्याचा कबजा व त्याचा वस्तुतः भोगवटा आणि तसेंच त्याचीं भाडीं व फायदे हीं, सदहू "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा उपयोग करण्यास सदहूप्रमाणें नाकारणारा किंवा हयगय करणारा अगर उपयोग करण्याचें बंद करणारा मनुष्य मरण पावला असतां ज्या मनुष्यास, प्रसंगानुसार सदहू फ्रामजी दिनशा पेटिट किंवा सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचा औरस पुरुष वारस या नात्यानें, सदहू बादशाही सनदेवरून दिलेली बारोनेटची पदवी व तिचा उपभोग हीं प्राप्त व्हावयाचीं, त्या मनुष्यास प्राप्त होऊन त्याचीं होतील असें समजावें ;

फायदा घेणारा मनुष्य दिनशा माणेकजी पेटिट या नांवाचा उपयोग करण्यास नाकारील, हयगय करील किंवा तसा उपयोग करण्याचें बंद करील तेव्हां हितसंबंध कोणाला प्राप्त होतो.

मात्र त्या वेळीं असा पुरुष वारस कोणी नसेल तर, सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचें पुरुष संतान आतां कोणी राहिलेलें नाहीं असें झालें असतां ज्या मनुष्यास किंवा मनुष्यांस तीं प्राप्त होण्याचा हक्क असेल त्यास किंवा त्यांस तीं प्राप्त होऊन त्याचीं किंवा त्यांचीं होतील असें समजावें.

भर्तृदत्तविधवावेतनाबदलचा खर्च एस्टेटीवर घालण्याचा अधिकार.

७. सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट व फ्रामजी दिनशा पेटिट आणि ज्या ज्या कोणत्याहि मनुष्यास सदर्हू बारोनेटचा किताब वेळोवेळीं प्राप्त होईल तो प्रत्येक मनुष्य यांच्यांतून जो कोणी सदर्हू "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा, त्या संबंधानें या आक्टांत सदरीं सांगितलेल्या मुदतीपर्यंत, या आक्टांत सदरीं ठरविल्याप्रमाणें उपयोग करण्यास नाकारणार नाहीं, हयगय करणार नाहीं किंवा तसा उपयोग करण्याचें बंद करणार नाहीं तो सदर्हू पदवीचा वस्तुतः उपभोग घेत असल्या मुदतींत, त्यास, कोणत्याहि स्त्रीशीं किंवा स्त्रियांशीं त्याचा विवाह होण्यापूर्वी किंवा झाल्यानंतर, कोणताहि दस्तऐवज किंवा लेख अगर कोणतेहि दस्तऐवज किंवा लेख करून त्यांवरून, ज्या कोणत्याहि स्त्रीशीं किंवा स्त्रियांशीं त्याचा विवाह होईल त्या स्त्रीस किंवा स्त्रियांस तिच्या किंवा त्यांच्या आयुर्मर्यादेपर्यंत, आणि वैधव्यजीवनांशाच्या किंवा इतर कायदेशीर अगर यथापद्धति हक्कांच्या बदला द्यावयाच्या तिच्या किंवा त्यांच्या भर्तृदत्तविधवावेतनाबदल, दाहा हजार रुपयांच्या रकमेहून अधिक नाहीं इतकी कोणतीहि सालियाना नेमणूक किंवा वार्षिक रकम ठरवून किंवा नेमून देण्याचा अधिकार आहे. सदर्हू दस्तऐवज किंवा लेख रद्द करण्याचा अधिकार त्यानें आपलेकडे ठेवून किंवा न ठेवितां, दोन किंवा अधिक विश्वसनीय साक्षिदारांच्या समक्ष त्यानें त्यांवर मोहर करून ते स्वाधीन केले पाहिजेत, आणि ते या हल्लींच्या अधिकाराअन्वयें व त्यावरहुकूम केलेल्या कोणत्याहि नेमणुकीपरत्वें जी कोणतीहि सालियाना नेमणूक किंवा कोणत्याहि सालियाना नेमणुकी त्या वेळीं चालत असून देण्यांत येत असतील त्या सालियाना नेमणुकीस किंवा सालियाना नेमणुकींस पात्र असून बाधक नसले पाहिजेत; आणि सदरीं सांगितलेल्या सालियाना नेमणुकीवर किंवा वार्षिक रकमेवर कोणत्याच प्रकारच्या करांचा व खर्चांचा बोजा असूं नये, व त्यांतून कोणतीहि रकम बाद होतां नये, आणि ती सालियाना नेमणूक किंवा वार्षिक रकम ठरवून किंवा नेमून देणाऱ्या मनुष्याच्या मरणोत्तर लगेच ती सुरू झाली पाहिजे व अमलांत आली पाहिजे; आणि ती सदर्हू स्टॉकांचें, फंडांचें व सिक्यूरिटींचें डिव्हिडण्ड, व्याज व सालीना उत्पन्न यांतून प्रतिवर्षीं जून महिन्याच्या तिसावे तारखेरोजीं एक, व डिसेंबर महिन्याच्या एकतिसावे तारखेरोजीं एक, अशा दोन साहामाही सारख्या हप्त्यांनीं देत गेलें पाहिजे व देण्याजोगी असेल; आणि सदर्हू साहामाही हप्त्यांपैकीं प्रथमचा हप्ता देणें तो, अशी सालियाना नेमणूक किंवा वार्षिक रकम नेमून देणाऱ्या मनुष्याच्या मरणोत्तर सदर्हू साहामाही दोन तारखांपैकीं जी तारीख पहिल्यानें येईल त्या तारखेरोजीं दिला पाहिजे; मात्र असें ठरविलें आहे कीं हमेश, ज्या कोणत्याहि मनुष्यास सदर्हू किताब प्राप्त होईल त्या मनुष्यानें "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा उपयोग करण्यास नाकारलें असल्यास किंवा हयगय केली असल्यास अगर त्यानें आपल्या आयुर्मर्यादेच्या मुदतींत लागोपाठ साहा क्यालेंडर महिनेपर्यंत त्या नांवाचा उपयोग करण्याचें बंद केल्यास, सदर्हू प्रत्येक ठराव व नेमणूक,—तीं मग त्यानें पूर्वी केलेलीं असोत अगर मागाहून केलेलीं असोत,— रद्द व निष्फळ होतील, आणि तसा कोणताहि ठराव किंवा नेमणूक अस्तित्वांत असली तथापि त्याअन्वयें उपस्थित झालेली किंवा नेमून दिलेली सदर्हू प्रकारची कोणतीहि सालियाना नेमणूक अमलांत येणार नाहीं, किंवा तिची रकम सदर्हू स्टॉक, फंड, व सिक्यूरिटी यांच्यांतून दिली जाणार नाहीं, किंवा तिचा त्यांच्यावर बोजा घातला जाणार नाहीं.

भर्तृदत्तविधवावेतनांच्या रकमेची रचना.

८. मात्र असें ठरविलें आहे कीं हमेश, सदर्हू स्टॉकांचें, फंडांचें व सिक्यूरिटींचें सदर्हू डिव्हिडण्ड, व्याज व सालीना उत्पन्न हीं, या आक्टांत सदरीं दिलेल्या अधिकारा-

वरहुकुम जें कोणतेंहि भर्तृदत्तविधवावेतन करून देण्यांत येईल किंवा तशीं कोणतींहि वेतनें करून देण्यांत येतील त्याच्या किंवा त्यांच्या बदल अगर त्याच्या किंवा त्यांच्या संबंधानें वीस हजार रुपयांच्या वार्षिक रकमेहून अधिक रकम त्यांतून दिली जाण्यास एकाच वेळीं पात्र होणार नाहींत, ह्मणजे, त्या अधिकाराच्या परत्वें किंवा अन्वयें सदर्हू डिव्हिडण्ड, व्याज व सालीना उत्पन्न यांच्यावर, हा ठराव येथें दाखल केला नाहीं तर, भर्तृदत्तविधवावेतनांच्या संबंधानें एंकदरीनें वीस हजार रुपयांहून अधिक अशा ज्या वार्षिक रकमेचा कोणत्याहि एकाच वेळीं बोजा पडण्याचा संभव आहे तसा बोजा त्यांच्यावर पडल्यास, ज्या वार्षिक रकमेच्या किंवा तिच्या ज्या भागाच्या योगानें सदर्हूप्रमाणें अधिक रकम होईल ती वार्षिक रकम किंवा तो तिचा भाग बाद करण्यांत येईल व दिला जाणार नाहीं.

लग्नाच्या बायकांचा म्यान्शन-हौसांत हितसंबंध नाहीं.

९. "पेटिट हॉल" या नांवाचें सदर्हू म्यान्शन-हौस व जमीनजुमला आणि त्यांतील हक्क, त्यांचीं अंगें व उपांगें हीं, सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या किंवा सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांच्या लग्नाच्या बायकोस, अगर तीं प्राप्त होण्याचा क्रमशः हक्क असलेल्या मनुष्यांपैकीं कोणत्याहि मनुष्यांच्या लग्नाच्या बायकांस, पारशी लोकांचा कोणताहि रिवाज किंवा कायदा याअन्वयें किंवा इतर कोणत्याहि प्रकारें, सदर्हू म्यान्शन-हौस व जमीनजुमला यांत जो कोणताहि हक्क, हितसंबंध, किंवा हक्कसंबंध असेल किंवा असल्याचा त्या दावा सांगतील त्या हक्कास, हितसंबंधास, किंवा हक्कसंबंधास पात्र होणार नाहींत असें समजावें.

नांवावर करून देणाराच्या हयातीपर्यंतच नांवावर करून देणें.

१०. जो शेवटचा शेषाधिकार किंवा उत्तराधिकार अनुक्रमें सर दिनशा माणेकजी पेटिट त्यांचे वारस, वहिवाट करणारे, आडमिनिस्ट्रेटर व असैनी यांसाठीं या आक्टांत सदरीं सांगितल्याप्रमाणें जिम्म्यावर ठेवण्याचें ठरविलें आहे त्याशिवाय इतर बाबतींत असा ठराव करण्यांत येत आहे कीं सदर्हू बारोनेटचा किताब व पदवी हीं चालू राहतील तोंपर्यंत, आणि सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या ज्या औरस पुरुष वारसांना सदर्हू बारोनेटचा किताब व पदवी हीं सदर्हू पदवी देण्यांत आलेल्या सनदेंतील अटींअन्वयें प्राप्त व्हावयाचीं तसे कोणी वारस आतां राहिले नाहींत असें होईपर्यंत, ज्यांच्या तर्फे सदर्हू बॉण्डांचें, स्टॉकांचें, फंडांचें, व सिक्यूरिटींचें डिव्हिडण्ड, व्याज, व सालीना उत्पन्न, अगर "पेटिट हॉल" या नांवाचें सदर्हू म्यान्शन-हौस व जमीनजुमला यांच्या संबंधानें या आक्टावरून जिम्मे ठरविले आहेत त्या सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांनीं व सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांनीं आणि अनुक्रमें त्यांचा त्यांचा कोणताहि औरस पुरुष वारस यानें, सदर्हू बॉण्ड, स्टॉक, फण्ड, व सिक्यूरिटी किंवा त्यांचा कोणताहि भाग, अगर त्यांचें डिव्हिडण्ड, व्याज व सालीना उत्पन्न किंवा त्यांचा कोणताहि भाग अगर सदर्हू म्यान्शन-हौस किंवा जमीनजुमला किंवा त्याचा कोणताहि भाग हीं, त्यांच्या त्यांच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतींत जो त्यांना हक्कसंबंध किंवा हितसंबंध असेल त्याहून अधिक हक्कसंबंधासाठीं किंवा हितसंबंधासाठीं किंवा त्या आयुर्मर्यादेहून अधिक मुदतीसाठीं आणि "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा ते सदर्हू आयुर्मर्यादेच्या जेवढ्या मुदतींत उपयोग करण्याचें चालू ठेवितील तेवढ्या मुदतीहून अधिक मुदतीसाठीं नांवावर करून देतां नये, त्यांची व्यवस्था करतां नये, तीं परहस्तगत करतां नये, तीं दानपत्रानें देतां नये किंवा त्यांजवर बोजा घालतां नये; आणि सदरीं सांगितलेल्या प्रकारच्या कोणत्याहि मनुष्यास, एकट्यालाच, किंवा सदर्हूपैकीं कोणत्याहि एका अगर अधिक मनुष्यांशीं मिळून किंवा इतर कोणत्याहि मनुष्याशीं अगर मनुष्यांशीं मिळून, अनुक्रमें सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांच्या व सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या किंवा त्यांच्यांतून कोणाहि एकाच्या औरस पुरुष वारसांसाठीं या आक्टांत सदरीं जिम्म्यांवर परिमित केलेले सदर्हू हक्कसंबंध, अथवा सदर्हू बॉण्डांच्या, स्टॉकांच्या, फंडांच्या व सिक्यूरिटींच्या डिव्हिडंडाचें, व्याजाचें व सालीना उत्पन्नाचें, किंवा सदर्हू

मान्शन-हौस व जमीनजुमला यांचे व तत्संबंधी भाड्यांचे व फायद्यांचे या आक्टावरून ज्या कोणत्याहि मनुष्याच्या किंवा मनुष्यांच्या फायद्यासाठीं जिम्मे ठरविले असतील त्या कोणत्याहि मनुष्याच्या किंवा मनुष्यांच्या फायद्यासाठीं यावरून किंवा यांत उपस्थित केलेला किंवा जिम्म्यावर ठरविलेला कोणताहि हक्कसंबंध किंवा हितसंबंध चालू ठेवण्याचें बंद करण्याचा अगर त्यास प्रतिबंध करण्याचा, अथवा या आक्टांत सदरीं लिहिलेल्या ठरावांच्या खऱ्या उद्देशाप्रमाणें सदर्हू ठिकाणें प्राप्त होण्याच्या, तीं धारण करण्याच्या किंवा तीं उपभोगण्याच्या अगर त्यांचा स्वीकार करण्याच्या किंवा तीं घेण्याच्या संबंधानें अशा कोणत्याहि मनुष्याला अगर मनुष्यांला मनाई करण्याचा कोणताहि अधिकार नाहीं असें समजावें; व सदर्हू ठिकाणांमध्यें किंवा त्यांतून कोणत्याहि ठिकाणांत सदरीं सांगित्याप्रकारच्या कोणत्याहि मनुष्यास, त्याचे हयातींत किंवा त्या हयातीच्या ज्या मुदतींत तो "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा उपयोग करण्याचें चालू ठेवील तेवढ्याच मुदतींत त्याला असलेल्या हक्कसंबंधाहून किंवा हितसंबंधाहून अधिक हक्कसंबंध किंवा हितसंबंध आहे असें कोणत्याहि कायद्याच्या किंवा न्यायनीतीच्या कोर्टानें समजूं नये; आणि या आक्टाच्या उद्देशाविरुद्ध कोणतेंहि दानपत्र, नेमणूकपत्र किंवा अभयपत्र करून देण्याचा प्रयत्न केल्यास तसा प्रत्येक प्रयत्न निष्फळ होईल व त्याप्रमाणें या कलमावरून फर्मविण्यांत व ठरविण्यांत येत आहे.

स्टॉक, फंड किंवा सिक्युरिटी न्यास्त घालून एस्टेट वाढविणें.

११. यापुढें कोणत्याहि वेळीं किंवा वेळांमध्यें सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट हे किंवा इतर कोणताहि पुरुष अगर स्त्री किंवा कोणतेहि पुरुष अगर स्त्रिया हीं या आक्टाच्या जिम्म्यांस विवक्षित काळीं पात्र असलेले फंड व सिक्युरिटी वाढविण्यास इच्छीत असून त्या कारणासाठीं व त्या उद्देशानें आपल्या स्वतःच्या खर्चानें, ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याच्या सरकारचे किंवा हिंदुस्तान सरकाराचे, अगर त्यांतून कोणत्याहि एका सरकारानें ज्यांच्या मुदलाची किंवा व्याजाची हमी दिलेली असेल असे, कोणतेहि स्टॉक, फंड किंवा सिक्युरिटी सदर्हू संस्थापित मंडळीच्या नांवावर करून देतील व तिच्या स्वाधीन करतील तर त्यावेळीं, व याप्रमाणें गोष्ट घडेल त्या प्रत्येक प्रसंगीं, सदर्हू संस्थापित मंडळी, मुंबईचे गव्हर्नर यांचें पूर्वी अनुमत घेऊन, असे स्टॉक, फंड व सिक्युरिटी स्वीकारण्यास मुखत्यार आहे; आणि मग पुढें असे स्टॉक, फंड व सिक्युरिटी हीं सदर्हू संस्थापित मंडळीनें मुंबई शहरच्या म्युनिसिपल कार्पोरेशनच्या सदर्हू बॉण्डांच्या संबंधानें या आक्टावरून जे जिम्मे ठरविले आहेत त्याच जिम्म्यांवर, किंवा त्या जिम्म्यांपैकीं जे कोणतेहि त्या त्या वेळीं चालू असून अमलांत असण्याजोगे असतील त्या जिम्म्यांवर धारण केलीं पाहिजेत.

स्थावर मिळकत न्यास्त घालून एस्टेट वाढविणें.

१२. तसेंच मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचें पूर्वी अनुमत घेऊन सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांना, व बारोनटचा सदर्हू किताब व पदवी हीं ज्या ज्या मनुष्यास प्राप्त होतील त्या प्रत्येक मनुष्याला, आणि इतर कोणत्याहि पुरुषाला अगर स्त्रीला किंवा पुरुषांना अगर स्त्रियांना, सदर्हू बादशाही सनदेवरून दिलेल्या बारोनेटच्या किताबास व पदवीस अधिक आश्रय देण्यासाठीं, आपली वंशपरंपरागत पूर्ण मालकीची व बिनगहाणाची आणि मुंबई इलाक्यांत असून सदर्हू कारणासाठीं योग्य असलेली कोणतीहि स्थावर मिळकत लावून देण्याचा अधिकार आहे; आणि अशा प्रत्येक प्रसंगीं, अशी कोणतीहि स्थावर मिळकत या आक्टावरून ठरावलेल्या जिम्म्यांवर सदर्हू संस्थापित मंडळीनें धारण केली पाहिजे असें गव्हर्नर इन् कौन्सिल हे, मुंबई सरकारचा ठराव काढून, फर्मविण्यास मुखत्यार आहेत; आणि असें झालें ह्मणजे मग पुढें अशी स्थावर मिळकत, सदर्हू जिम्म्यांवर किंवा त्यांतून त्या त्या वेळीं जे कोणतेहि चालू असून अमलांत असण्याजोगे असतील त्या जिम्म्यांवर, आणि अशी स्थावर मिळकत या आक्टांत दाखल केली असती तर ज्या रीतीनें व ज्या कार्यासाठीं सदर्हू संस्थापित मंडळीच्या

नांवावर करून दिली असती त्याच रीतीनें व त्याच कार्यासाठीं या आक्टापरत्वें सदर्हू संस्थापित मंडळीच्या नांवावर करून दिली पाहिजे.

१३. सदर्हू संस्थापित मंडळीनें "पेटिट हाल" या नांवाच्या म्यान्शन-हौसचा, व तत्संबंधी सर्व उपगृहांचा व ऑफिसांचा, आणि तसेंच वेळोवेळीं त्यांस ज्यास्त जोडलेल्या किंवा त्यांच्या बदला योजलेल्या किंवा यापुढें या आक्टाच्या कोणत्याहि जिम्म्यांस पात्र होणाऱ्या इतर सर्व घरवाड्यांचा व इमारतींचा आग लागून नाश किंवा तोटा होऊं नये ह्मणून त्यांचा आपल्या नांवें, किंवा सदर्हू संस्थापित मंडळींत विवक्षित काळीं जे मनुष्य असतील त्यांच्या नांवें, योग्य विमा उतरून ठेविला पाहिजे; आणि या आक्टाच्या जिम्म्यांस विवक्षित काळीं पात्र असलेल्या फंडांच्या उत्पन्नाचा कोणताहि भाग त्या कारणासाठीं लावण्यास सदर्हू संस्थापित मंडळी मुखत्यार आहे; आणि याप्रमाणें विमा उतरलेल्या सदर्हू जमीनजुमल्यांचा व ठिकाणांचा किंवा त्यांच्या कोणत्याहि भागाचा आग लागून नाश किंवा तोटा झाल्यास त्यावेळीं सदर्हूप्रमाणें उतरलेल्या विम्याच्या संबंधानें जो पैसा येईल तो, सदर्हूप्रमाणें आग लागून नाश किंवा तोटा झालेला जमीनजुमला व ठिकाण पुनः बांधण्याच्या किंवा पुनः स्थापन करण्याच्या कामीं सदर्हू संस्थापित मंडळीच्या हुकुमाअन्वयें खर्च केला पाहिजे, अगर तो, विवक्षित काळीं सदर्हू बारोनेटच्या किताबावर हक्क असून त्याचा उपभोग घेत असलेल्या मनुष्यानें अर्जी केली असतां मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचें अनुमत घेऊन—हें अनुमत मुंबई सरकारानें ठराव करून जाहीर केलें पाहिजे—सदर्हू किताबाची योग्यता चालू राहण्यास योग्य असा मुंबई इलाक्यांत इतर जमीनजुमला विकत घेण्याच्या कामीं खर्च करण्याचा अधिकार आहे; व याप्रमाणें नवीन जमीनजुमला विकत घेण्यांत येईल त्या प्रसंगीं तो, तत्संबंधी खरेदीचें काम पुरें झाल्यापासून व त्यानंतर लगेच, या आक्टांत ठरविलेल्या उपयोगांस व जिम्म्यांस, किंवा त्यांतून त्या वेळीं जे कोणतेहि चालू असून अमलांत असण्याजोगे असतील त्या उपयोगांस व जिम्म्यांस, तो जमीनजुमला या आक्टाच्या पांचव्या कलमांत स्पष्टपणें दाखल केला असता तर ज्या रीतीनें व जितका पात्र असता व पात्र झाला असता त्याच रीतीनें व तितकाच पात्र असेल व पात्र होईल. सदर्हूप्रमाणें विम्याच्या संबंधानें आलेला पैसा सदर्हूप्रमाणें खर्च करण्यांत येई तोंपर्यंत तो किंवा त्याचा कोणताहि भाग १७ व्या कलमांत निर्दिष्ट केलेल्या सरकारी सिक्यूरिटींतून कोणत्याहि सिक्यूरिटी घेण्याच्या कामीं लावण्यास सदर्हू संस्थापित मंडळी मुखत्यार आहे.

*म्यान्शन-हौसचा विमा, व विम्याच्या संबंधानें मिळालेल्या पैशाचा विनियोग.*

१४. "पेटिट हाल" या नांवाचें सदर्हू म्यान्शन-हौस व ठिकाण आणि त्यांत जें कांहीं ज्यास्त वाढविण्यांत येईल तें सर्व, आणि तसेंच या आक्टावरून ठरविलेल्या जिम्म्यांस वेळोवेळीं पात्र असतील किंवा होतील त्या सर्व इतर घरवाड्या व जमीनजुमले हीं किंवा त्यांतून प्रत्येक, सदर्हू बादशाही सनदेवरून दिलेल्या बारोनेटच्या किताबाचा विवक्षित काळीं उपभोग घेणाऱ्या मनुष्यानें आपल्या खर्चानें चांगलें दुरुस्त, व्यवस्थेशीर व चांगल्या स्थितींत ठेविलें पाहिजे; आणि अशा कोणत्याहि मनुष्यानें, सदर्हू म्यान्शन-हौस, जमीनजुमला व ठिकाणें किंवा त्यांतून कोणतेंहि, चांगल्या स्थितींत ठेवण्यास कोणत्याहि वेळीं हयगय केल्यास किंवा नाकारल्यास, तें चांगल्या स्थितींत ठेवण्याचा किंवा ठेवविण्याचा, आणि त्या संबंधानें होणारा खर्च या आक्टांतील ठरावांस विवक्षित काळीं पात्र असलेल्या फंडांच्या उत्पन्नांतून देण्याचा सदर्हू संस्थापित मंडळीस अधिकार आहे.

*म्यान्शन-हौस व इतर जमीनजुमला दुरुस्त ठेवणें.*

१५. सदर्हू संस्थापित मंडळीनें, "पेटिट हाल" या नांवानें प्रसिद्ध असलेलें म्यान्शन-हौस व जमीनजुमला आणि तसेंच या आक्टापरत्वें विवक्षित काळीं त्या मंडळीच्या नांवावर करून देण्यांत येईल तो कोणताहि जमीनजुमला हीं, सदर्हू बादशाही सनदेवरून

*म्यान्शन-हौस किंवा इतर जमीनजुमला विकण्याचा अगर तीं बदलून दुसरीं घेण्याचा संस्थापित मंडळीचा अधिकार.*

दिलेल्या बारोनेटच्या किताबावर हक्क असून त्या किताबाचा वस्तुतः उपभोग घेणाऱ्या मनुष्याच्या अनुमतानें आणि मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या सदरीं सांगिल्याप्रमाणें जाहीर करून दिलेल्या अनुमतानें, मुंबई इलाक्यांत दुसऱ्या जमिनी किंवा जमीनजुमले घेण्याकरितां विकण्यासाठीं, अगर तशा जमिनी किंवा जमीनजुमले घेऊन त्यांच्या बदला देण्यासाठीं जिम्म्यांवर धारण केलीं पाहिजेत, आणि तीं याप्रमाणें दुसऱ्यांच्या बदला देण्यांत येतील तेव्हां अदलाबदलीची किंमत सारखी होण्यासाठीं लागेल तो कोणताहि पैसा दिला किंवा घेतला पाहिजे.

अशा विक्रीच्या किंवा अदलाबदलीच्या संबंधानें संस्थापित मंडळीचे अधिकार.

१६. आणि या कलमावरून असें ठरविण्यांत येत आहे कीं सदर्हूप्रमाणें कोणतीहि विक्री करणें ती, जाहीर लिलांव करून किंवा खासगी करार करून करण्याचा अधिकार आहे, व सदर्हू जमीनजुमल्याच्या किंवा त्याच्या कोणत्याहि भागाच्या विक्रीच्या कोणत्याहि शर्तीमध्यें, किंवा विक्रीसंबंधी अगर अदलाबदलीसंबंधी करारांत, मालकीच्या संबंधानें किंवा मालकी प्राप्त झाल्याबदलच्या पुराव्याच्या अगर तिच्या सुरवातीच्या संबंधानें अगर इतर कोणत्याहि संबंधानें कोणत्याहि अटी करण्यास, आणि विक्रीसंबंधी किंवा अदलाबदलीसंबंधी कोणताहि करार विकत घेतल्यानें किंवा रद्द केल्यानें किंवा त्यांत फेरबदल केल्यानें व पुनः विकल्यानें किंवा पुनः अदलाबदल केल्यानें कोणतेंहि नुकसान झाल्यास त्याबदल जबाबदार न होतां तसा करार विकत घेण्यास, किंवा रद्द करण्यास किंवा फेरबदल करण्यास व पुनः विकण्यास किंवा पुनः अदलाबदल करण्यास सदर्हू संस्थापित मंडळी मुखत्यार आहे.

अशा विक्रीनें किंवा अदलाबदलीनें मिळालेला पैसा व्याजू लावणें.

१७. आणि या कलमावरून असें ठरविण्यांत येत आहे कीं सदर्हू संस्थापित मंडळीनें, सदर्हूप्रमाणें करण्यांत आलेल्या कोणत्याहि विक्रीच्या किंवा अदलाबदलीच्या संबंधानें येणें झालेला सर्व पैसा घेतला पाहिजे, आणि तो, सोईप्रमाणें होईल तितका लौकर, ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याचे किंवा हिंदुस्तान सरकारचे, अगर त्यांतून कोणत्याहि एका सरकारानें ज्यांच्या मुदलाची व व्याजाची हमी दिलेली असेल असे, कोणतेहि स्टॉक, फंड किंवा सिक्यूरिटी विकत घेण्याच्या कामीं, किंवा मुंबई इलाक्यांत असून सदर्हू किताबाची योग्यता चालू राहण्यास योग्य अशा दुसऱ्या जमिनी अगर जमीनजुमले विकत घेण्याच्या कामीं लावला पाहिजे; मात्र इतकेंच कीं याप्रमाणें जमिनी किंवा जमीनजुमलें विकत घेणें असतील त्या प्रत्येक प्रसंगीं, सदर्हू किताबावर त्यावेळीं हक्क असून त्याचा वस्तुतः उपभोग घेणाऱ्या मनुष्याचें त्या संबंधानें अनुमत घेतलें पाहिजे.

अशा विक्रीच्या किंवा अदलाबदलीच्या योगानें जो पैसा उत्पन्न होऊन व्याजू लावण्यांत येईल तो व ज्या जमिनी प्राप्त होतील त्या या आक्टावरून ठरविलेल्या जिम्म्यावर धारण करणें.

१८. आणि या कलमावरून असें ठरविण्यांत येत आहे कीं सदर्हूप्रमाणें विकत घेण्यांत येतील ते स्टॉक, फंड, व सिक्यूरिटी आणि जमिनी किंवा जमीनजुमले, आणि अदलाबदल करून घेण्यांत येतील त्या जमिनी किंवा जमीनजुमले हीं तत्संबंधी खरेदीचें किंवा अदलाबदलीचें काम पुरें झाल्यापासून व पुरें झाल्यानंतर लगेच, मुंबई शहरच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या सदर्हू बॉण्डांच्या संबंधानें व "पेटिट हाल" या नांवाचें सदर्हू म्यानशन-हौस व ठिकाण यांच्या संबंधानें या आक्टांत व या आक्टावरून जे जिम्मे ठरविले आहेत त्या जिम्म्यांवर किंवा त्यांतून जे कोणतेहि त्या वेळीं चालू असून अमलांत असण्या जोगे असतील त्या जिम्म्यांवर धारण केलीं पाहिजेत.

संस्थापित मंडळीचा खर्च भरून काढणें.

१९. या आक्टांतील जिम्म्यांपरत्वें व ठरावांपरत्वें सदर्हू संस्थापित मंडळीच्या हातीं जो पैसा येईल त्या पैशांतून आपल्यापाशीं पैसा ठेवून घेण्याचा, आणि सदरीं सांगितलेले अधिकार, जिम्मे व ठराव बजाविण्याच्या कामीं किंवा बजाविण्यासाठीं अगर तत्संबंधानें त्या मंडळीस जो व्यय होईल, जो तोटा सोसावा लागेल व जो खर्च करावा लागेल तो सर्व भरून काढण्याचा त्या मंडळीस अधिकार आहे.

२०. मात्र असें ठरविलें आहे की उलीयाजा मलिका माआझमा महाराणी साहेब, त्यांचे वारस व स्थानापन्न यांना आणि ( सदहू दिनशा माणेकजी पेटिट, त्यांचे डिव्हेसी [मृत्युपत्रावरून ज्यांना मिळकत मिळेल ते मनुष्य], वारस व असैनी यांच्याखेरीज ) इतर कोणताहि पुरूष किंवा कोणतीहि स्त्री व इतर कोणतेहि पुरूप किंवा कोणत्याहि स्त्रिया आणि राजकीय व संस्थापित मंडळ्या, आणि अनुक्रमें त्याचे, तिचें व त्यांचे वारस, स्थानापन्न, वहिवाट करणारे व आड्मिनिस्ट्रेटर या सर्वांना व प्रत्येकाला "पेटिट हाल" या नांवाचें सदहू म्यानृशन-हौस व जमीनजुमला किंवा त्यांचा कोणताहि भाग अगर कोणतेहि भाग यांत किंवा यांवर जो कोणत्याहि प्रकारचा हक्कसंबंध, हक्क, मालकी, हितसंबंध, दावा सांगण्याचा हक्क व मागणी सांगण्याचा हक्क, हा आक्ट ठरण्याचे पूर्वी, असेल व त्यांनीं धारण केला व उपभोगिला असेल, आणि हा आक्ट ठरला नसता तर त्यांना असता, असूं शकता किंवा असण्याचा संभव असता, अगर त्यांनीं धारण केला किंवा उपभोगिला असता अगर ते धारण करूं अगर उपभोगूं शकते अगर त्यांनीं धारण करण्याचा किंवा उपभोगण्याचा संभव असता तो सर्व हक्कसंबंध, हक्क, मालकी, हितसंबंध, दावा सांगण्याचा हक्क व मागणी सांगण्याचा हक्क त्या सर्वांना व प्रत्येकाला असेल असें समजावें. विद्यमान हक्क कायम ठेवणें.

---

## कारणें व हेतु यांचें निरूपण.

या मसुद्याचा हेतु ह्मटला ह्मणजे सर दिनशा माणेकजी पेटिट यांना दिलेल्या बारोनेटच्या किताबाच्या संबंधाची नेमणूक नियुक्त करणें हा होय.

हा मसुदा सन १८६० च्या २०व्या आक्टाच्या पद्धतीवर तयार केला असून सर दिनशा शेट यांना सल्ला देणारांच्या व मुंबई सरकाराच्या सल्लामसलतीनें ठरविला आहे.

तारीख ११ जानेवारी सन १८९३.

(सही) आलेक्स. एड्व. मिलर.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

## अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्यांवर विशेष चांगली नजर ठेवून त्यांस निर्बंधांत राखण्याविषयीं व इतर कारणांविषयीं बंदोबस्त करण्याबाबतच्या आक्टाचा मसुदा.

---

ज्यापेक्षां अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्यांवर विशेष चांगली नजर ठेऊन त्यांस निर्बंधांत राखण्याविषयीं व यांत पुढें दिलेल्या इतर कांहीं बाबतींविषयीं बंदोबस्त करणें योग्य आहे;

त्यापेक्षां हल्लीं येणेंप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) या कायद्यास, सन १८९३ चा अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्यांबाबद आक्ट, असें ह्मणावें; सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सर्व ब्रिटिश इंडियास लागू आहे; आणि

(३) तो रोजीं अमलांत येईल.

२. सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या ११०व्या कलमांत, "असी बातमी लागेल कीं आपल्या हुकुमतीच्या स्थलसीमेंतलि कोणत्याही मनुष्यास जबरीचोरी करण्याची, अगर घर फोडण्याची अगर चोरी करण्याची, किंवा चोरीचा माल आहे असें माहीत असून तो घेण्याची सवय आहे, किंवा जुलमानें घेण्याचा अपराध करण्याची सवय आहे, किंवा जुलमानें घेण्यासाठीं लोकांस नुकसानी करण्याचें भय घालण्याची किंवा घालण्याचा यत्न करण्याची सवय आहे," या मजकुराबद्दल पुढील मजकूर दाखल करावा; तो येणेंप्रमाणें:— अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्याकडून चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण.

"असी बातमी लागेल कीं आपल्या हुकुमतीच्या स्थलसीमेंतील कोणा मनुष्यास—

(अ) जबरीचोरी करण्याची, घर फोडण्याची किंवा चोरी करण्याची सवय आहे, किंवा

(ब) चोरीचा माल आहे असें माहीत असून तो घेण्याची सवय आहे, किंवा

(क) चोरांचा बचाव करण्याची किंवा त्यांस आश्रय देण्याची, किंवा चोरीचा माल लपविण्याच्या किंवा त्याचा निकाल लावण्याच्या कामीं मदत करण्याची सवय आहे, किंवा

(ड) अपक्रिया किंवा जुलमानें घेण्याचा अपराध करण्याची सवय आहे, किंवा

(इ) जुलमानें घेण्यासाठीं लोकांस नुकसानी करण्याचें भय घालण्याची किंवा घालण्याचा यत्न करण्याची सवय आहे, किंवा

(फ) तो इतक्या धाडशी व भयंकर स्वभावाचा आहे कीं त्यास तारणावांचून मोकळा राहूं देणें हें लोकांस धोक्याचें आहे,"

चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण घेण्याच्याबदला, पोलिसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार.

३. जेव्हां कोणी प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटानें, जिल्हा-माजिस्ट्रेटानें किंवा पोटतुकडी-माजिस्ट्रेटानें, किंवा पहिल्या वर्गाच्या ज्या माजिस्ट्रेटास या बाबतींत स्थानिक सरकारानें मुद्दाम अधिकार दिला असेल त्या पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटानें, या आक्टावरून सुधारलेलें सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड, याच्या ११० व्या कलमांत सांगितल्या प्रकारच्या कोणत्याही मनुष्यास, चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल मुचलका लिहून देण्याविषयीं हुकूम न करण्याचें कारण दाखविण्यास फर्माविलें असेल,

तेव्हां अशा माजिस्ट्रेटास योग्य वाटेल तर त्याला, सदरहू कोडाच्या ११८ व्या कलमाअन्वयें अशा मनुष्यास सदरील प्रकारचा मुचलका लिहून देण्याविषयीं हुकूम करण्याच्याबदला, त्यास पराकाष्ठा तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे.

चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण न दिलें असतां, पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार.

४. कोणा मनुष्यास सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाचें कलम ११८ याअन्वयें चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण देण्याविषयीं हुकूम झालेला असून तो मनुष्य, असें तारण ज्या मुदतीबद्दल देण्याविषयीं हुकूम झाला ती मुदत सुरू होण्याच्या तारखेस किंवा त्या तारखेपूर्वी तें देण्यास चुकेल, तर असें तारण देण्याविषयीं हुकूम करणाऱ्या माजिस्ट्रेटास, सदरहू मनुष्याला सदरहू कोडाच्या १२३ व्या कलमाअन्वयें तुरुंगांत पाठविण्याविषयीं किंवा तुरुंगांतच ठेवण्याविषयीं हुकूम करण्याच्याबदला, त्यास पराकाष्ठा तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे.

ज्या मनुष्याविषयीं अपराधाच्या शाबितीचे ठराव झालेले असतील त्यांस, कलमें ६ व ७ यांच्या कारणांकरितां, "अपराध करण्याची सवय असलेले मनुष्य" म्हणून ठरविण्याचा अधिकार.

५. जेव्हां कोणा मनुष्याविषयीं, हिंदुस्थानच्या पीनल कोडाच्या १२ व्या किंवा १७ व्या बाबीअन्वयें तीन किंवा त्याहून जास्त मुदतीची कैदेची शिक्षा होण्याजोगा अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव होईल, आणि

(अ) त्याजविषयीं, तशाच प्रकारचा कोणताही अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव पूर्वी झाला असल्याबद्दल पुरावा करण्यांत येईल, व

(ब) त्यास गुन्हा करण्याची सवय आहे किंवा गुन्हा करणें हें त्याचें उपजीविकेचें साधनच बनून राहिलें आहे अशी कोर्टाची किंवा माजिस्ट्रेटाची त्यापुढें हजर केलेल्या साक्षीपुराव्यावरून खातरी होईल,

तेव्हां अशा कोर्टास किंवा माजिस्ट्रेटास, त्या मनुष्याला, या आक्टाचीं कलमें ६ व ७ यांच्या कारणांकरितां, अपराध करण्याची सवय असलेला मनुष्य म्हणून ठरविण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे.

अपराधाच्या शाबितीचा ठराव करणाऱ्या कोर्टास, अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्याला, कैदेच्या किंवा काळ्या पाण्याच्या शिक्षेखेरीज आणखी, पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे.

६. (१) कोणत्याही हैकोर्टास, सेशन कोर्टास, प्रेसिडेन्सी-माजिस्ट्रेटास, जिल्हा-माजिस्ट्रेटास किंवा पोटतुकडी-माजिस्ट्रेटास, किंवा पहिल्या वर्गाच्या ज्या माजिस्ट्रेटास या बाबतींत स्थानिक सरकारानें मुद्दाम अधिकार दिला असेल त्या पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटास योग्य वाटेल तर त्याला, अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्यास कैदेची किंवा काळ्या पाण्याची शिक्षा देतेवेळीं त्यास आणखी, अशा शिक्षेची मुदत संपल्याच्या तारखेपासून पराकाष्ठा सात वर्षांच्या मुदतीपर्यंत पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं हुकूम करण्याचाही अधिकार आहे.

(२) पोटकलम (१) अन्वयें ज्यास मुद्दाम अधिकार दिलेला नाहीं अशा पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटानें, किंवा दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गाच्या माजिस्ट्रेटानें अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्यास कैदेची शिक्षा दिली असून, त्या शिक्षेची मुदत संपल्यावर त्याला पोलीसच्या नजरेखालीं ठेवणें अवश्य आहे असें सदरहू माजिस्ट्रेटास वाटेल, तेव्हां त्यानें तें आपलें मत लिहून ठेवावें, आणि आपण चालविलेल्या कामाचे कागद, तो ज्या जिल्हा-माजिस्ट्रेटाच्या किंवा पोटतुकडी-माजिस्ट्रेटाच्या ताब्यांत असेल त्याकडे पाठवून देऊन त्या मनुष्यासही तिकडे रवाना करावा. [१८८२ चा आक्ट १०, क. ३४९ पहा.]

(३) ज्या माजिस्ट्रेटाकडे असे कागद पाठविले असतील त्यास योग्य वाटेल तर तो, पक्षकारांस तपासण्यास व त्या खटल्यांत ज्याची पूर्वीं साक्ष झाली आहे अशा कोणत्याही साक्षीदारास पुनः बोलावून तपासण्यास, आणि जास्त पुरावा मागवून घेण्यास मुखत्यार आहे; आणि तसेंच त्यास योग्य वाटेल तर तो, सदरहू मनुष्यास दिलेल्या शिक्षेची मुदत संपल्याच्या तारखेपासून पराकाष्ठा सात वर्षांच्या मुदतीपर्यंत पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं हुकूम करण्यासही मुखत्यार आहे.

पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं हुकूम करण्याचा अपील कोर्टास अधिकार.

७. सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाचें कलम ४२३, रकम (ब), याअन्वयें काम चालविणाऱ्या अपील कोर्टास योग्य वाटेल तर त्याला, अपराध करण्याची सवय असलेल्या ज्या मनुष्यास कैदेची किंवा काळ्या पाण्याची शिक्षा दिली असेल त्यास, अशा शिक्षेची मुदत संपल्याच्या तारखेपासून पराकाष्ठा सात वर्षांच्या मुदतीपर्यंत पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे.

पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं केलेल्या हुकुमांच्या बाबतींत अपील व तपासणी.

८. (१) या आक्टाच्या ३ऱ्या कलमाअन्वयें पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं केलेला दरेक हुकूम हा, सन १८८२च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाचें कलम ११८ याअन्वयें तारण देण्याविषयीं केलेला हुकूम असल्याप्रमाणेंच, वरिष्ठ कोर्टांस व माजिस्ट्रेटांस करावयाच्या अपिलाच्या हक्कांस व त्यांच्या तपासणीच्या अधिकारांस पात्र राहील.

(२) या आक्टाच्या ६ व्या किंवा ७ व्या कलमाअन्वयें पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं केलेला दरेक हुकूम हा, तो ज्या शिक्षेच्या हुकुमास जोडला असेल त्या शिक्षेचा भाग असल्याप्रमाणेंच, वरिष्ठ कोर्टांस व माजिस्ट्रेटांस करावयाच्या अपिलाच्या हक्कांस व त्यांच्या तपासणीच्या अधिकारांस पात्र राहील.

अधिकार देणें, चालू ठेवणें व रद्द करणें.

९. सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाचीं कलमें ३९, ४० व ४१ यांतील ठराव, या आक्टाच्या ३ ऱ्या किंवा ६ व्या कलमाअन्वयें स्थानिक सरकारानें माजिस्ट्रेटांस अधिकार देण्याविषयीं केलेल्या हुकुमाच्या बाबतींत लागू होतील असें समजावें.

पोलीसच्या नजरेऐवजीं, चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण कबूल करण्याचा अधिकार.

१०. (१) पोलीसच्या नजरेखालीं ठेवलेल्या कोणत्याही मनुष्यास कोणत्याही वेळीं, कोणत्याही प्रेसिडेन्सी-माजिस्ट्रेटास, जिल्हा-माजिस्ट्रेटास किंवा पोटतुकडी-माजिस्ट्रेटास, पोलीसच्या नजरेऐवजीं आपणाकडून चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण घ्यावें, अशी अर्जी करण्याचा अधिकार आहे.

(२) जर सदरहू माजिस्ट्रेटास, सदरहू मनुष्यावर पोलीसची नजर चालू ठेवणें जरूर आहे असें वाटेल, तर त्यानें ती अर्जी नामंजूर करावी, परंतु तसें करण्याचीं आपलीं कारणें लिहून ठेवावीं.

(३) जर अशा माजिस्ट्रेटास, सदरहू मनुष्याकडून पोलीसच्या नजरेऐवजीं तारण घेतल्यानें लोकांस किंवा कोणत्याही मनुष्यास धोका पोहंचण्यासारखा नाहीं असें वाटेल, तर— [१८८२चा आक्ट १०, क. १२८, पारा १ पहा.]

(अ) त्या मनुष्यास पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याचा हुकूम स्वतः अशा माजिस्ट्रेटानें किंवा त्याच्यापूर्वी त्याच्या हुद्यावर असणाऱ्या माजिस्ट्रेटानें किंवा ताब्यांतील कोणत्याही माजिस्ट्रेटानें केलेला असल्यास, त्यानें सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या ११२ व्या कलमाअन्वयें हुकूम केला पाहिजे; आणि

[१८८२चा आक्ट १०, क. १२४, पारा २ पहा.]

(ब) सदरहू मनुष्यास पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याचा हुकूम हे कोर्टानें, सेशन कोर्टानें किंवा वरिष्ठ माजिस्ट्रेटानें केलेला असल्यास, त्यानें प्रसंगाप्रमाणें अशा कोर्टास किंवा माजिस्ट्रेटास त्या प्रकरणाबद्दल लगेच रिपोर्ट करून त्याचा हुकूम मागविला पाहिजे, व अशा कोर्टास किंवा माजिस्ट्रेटास योग्य वाटल्यास त्याला, सदरहू कोडाच्या ११२व्या कलमाअन्वयें हुकूम करण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

(४) सदरहू कोडाच्या ८व्या बाबीचे ठराव लागू होण्यासारखे असतील तेथवर ते, या कलमांत सांगितल्याप्रमाणें त्या कोडाच्या ११२व्या कलमाअन्वयें केलेल्या दरेक हुकुमाच्या बाबतींत लागू होतील असें समजावें:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अर्जदाराच्या चांगल्या वर्तणुकीबद्दल घेतलेला मुचलका, अर्जदारास १२४व्या कलमाअन्वयें सोडून दिलें नसल्यास किंवा तो मुचलका १२५व्या कलमाअन्वयें रद्द केला नसल्यास, अर्जदारास ज्या मुदतीपर्यंत पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याचा हुकूम झाला होता ती मुदत संपेतोंपर्यंत अमलांत राहील.

(५) जेव्हां कोणताही मनुष्य या कलमाअन्वयें चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण देईल तेव्हां, ज्या हुकुमावरून त्याला पोलीसच्या नजरेखालीं ठेवलें होतें तो रद्द होईल असें समजावें.

पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याबाबदचा हुकूम रद्द करण्याचा अधिकार.

[१८८२चा आक्ट १०, कलमें १२४, १२५ पहा.]

११. जेव्हां कोणत्याही प्रेसिडेन्सी-माजिस्ट्रेटास किंवा जिल्हा-माजिस्ट्रेटास, पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याबाबदचा एकादा हुकूम रद्द केला असतां, लोकांस किंवा कोणत्याही मनुष्यास धोका पोहंचण्यासारखा नाहीं असें वाटेल, तेव्हां,—

(अ) असा हुकूम स्वतः त्यानें किंवा त्याच्यापूर्वी त्या हुद्यावर असणाऱ्या माजिस्ट्रेटानें किंवा ताब्यांतील कोणत्या तरी माजिस्ट्रेटानें केलेला असल्यास, त्यानें तो रद्द करावा, आणि;

(ब) तो हुकूम हे कोर्टानें किंवा सेशन कोर्टानें केलेला असल्यास, त्यानें अशा कोर्टास त्या प्रकरणाबद्दल लगेच रिपोर्ट करून त्याचा हुकूम मागविला पाहिजे, आणि अशा कोर्टास योग्य वाटल्यास, त्या कोर्टानें तो रद्द करावा.

पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याच्या संबंधानें कानू करण्याचा अधिकार.

[१८७१चा आक्ट २७, क. १८ पहा.]

१२. (१) स्थानिक सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वी मंजुरी घेऊन, पुढील सर्व किंवा त्यांपैकीं कोणत्याही बाबतींसंबंधीं, ह्मणजे,—

(अ) पोलीसच्या नजरेखालीं असणाऱ्या मनुष्यांचीं रजिस्टरें ठेवणें;

(ब) अशीं रजिस्टरें कोणत्या नमुन्याप्रमाणें करावयाचीं तें;

(क) विवक्षित स्थळीं नोंदलेल्या मनुष्यांस कोणत्या हद्दींच्या आंत राहण्याची परवानगी आहे तें;

(ड) पोलीसच्या नजरेखालीं असणाऱ्या मनुष्यांस कोणत्या शर्तींवर आपल्या नांवांचा वर्ग एका रजिस्टरांतून दुसऱ्या रजिस्टरांत करून घेतां येईल तें;

(इ) आपली नोंदलेली राहण्याची जागा बदलण्याचा इरादा नसणाऱ्या मनुष्यांस कोणत्या शर्तींवर हंगामी पास देतां येतील तें;

(फ) अशा कोणत्याही पासांत—

(१) असा पास असणाऱ्या मनुष्यास कोणत्या जागीं जाण्याचा व कोणत्या हद्दींच्या आंत फिरण्याचा अधिकार आहे त्याबाबद,

(२) त्यानें वेळोवेळीं कोणत्या अमलदारांपुढें हजर झालें पाहिजे त्याबाबद, व

(३) कोणत्या मुदतींत त्यास गैरहजर राहण्याचा अधिकार आहे त्याबाबद,

नमूद करावयाच्या शर्ती;

(ग) ज्या मनुष्यांचीं नांवें राजिस्टरांत असतील तीं सदरहू हद्दींत नेमलेल्या तासांत किंवा वेळीं खरोखर हजर असल्याचें समजावें ह्मणून हजिरीच्या वेळीं किंवा इतर रीतीनें त्यांनीं जाब द्यावयाचा त्याबाबद शर्ती;

(ह) अशा मनुष्यांच्या वस्तीच्या जागांची तपासणा करणें, व त्यामध्यें राहणारांस चोरीचा माल लपवितां येण्यासाठीं व आपलें राहण्याचें ठिकाण परवानगीवांचून सोडून जातां येण्यासाठीं युक्त्या करण्याचा प्रतिबंध करणें किंवा तशा युक्त्या केल्या असतील त्या नष्ट करणें; आणि

(ऐ) साधारणतः, पोलीसची नजर ठेवण्याच्या संबंधानें या आक्टाचे हेतु सिद्धीस नेणें;

या बाबतींसंबंधीं कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) स्थानिक सरकारास, सदरीलप्रमाणें मंजुरी घेऊन, या कलमाअन्वयें केलेली कोणतीहि कानू रद्द करण्याचा किंवा तींत फेरफार करण्याचा अधिकार आहे.

(३) या कलमाअन्वयें केलेली कोणतीही कानू, व तसेंच ती रद्द करण्याबाबद किंवा तींत फेरफार करण्याबाबद केलेला कोणताही ठराव, हीं सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध करण्यांत येत तोंपर्यंत तीं अमलांत येणार नाहींत.

कानू तोडल्याबद्दल शिक्षा. [१८७१ चा आक्ट २७, क. १९ पहा.]

१३. जर पोलीसच्या नजरेखालीं असणारा कोणताही मनुष्य, कलम १२ अन्वयें केलेली कोणतीही कानू तोडील, तर त्याला पराकाष्ठा एक वर्षाच्या मुदतीची कैदेची शिक्षा होईल, किंवा दंडाची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

पोलीसच्या नजरेखालीं असणारा मनुष्य नेमलेल्या हद्दींबाहेर सांपडला असतां, त्यास धरणें. [१८७१ चा आक्ट २७, क. २० पहा.]

१४. (१) जर पोलीसच्या नजरेखालीं असणारा कोणी मनुष्य, त्यास ज्या स्थळीं नोंदलें असेल त्या स्थळाच्या हद्दींबाहेर ब्रिटिश इंडियाच्या कोणत्याही भागांत, १२ व्या कलमाअन्वयें केलल्या कानूंप्रमाणें जरूर असणाऱ्या पासावांचून सांपडेल, किंवा त्याच्या पासाच्या शर्तींप्रमाणें परवानगी नसणाऱ्या जागीं किंवा वेळीं सांपडेल, त्यास वारंटावांचून धरून माजिस्ट्रेटापुढें नेण्याचा कोणत्याही पोलीस अमलदारास किंवा गांवच्या जागल्यास अधिकार आहे. अशा माजिस्ट्रेटानें, अवश्य गोष्टींची शाबिती झाल्यावर, त्याला, ज्या प्रदेशांत त्यानें राहावयाचें होतें तेथें त्याची सदरहू कानूंप्रमाणें व्यवस्था होण्यासाठीं, तिकडे रवाना करण्याविषयीं हुकूम केला पाहिजे.

(२) कैद्यांस रवाना करण्याबाबद त्या त्या वेळीं कायद्यांत जी रीति ठरविलेली असेल ती, या कलमाअन्वयें रवाना करावयाच्या सर्व मनुष्यांस लागू होईल असें समजावें:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा कोणत्याही मनुष्यास रवाना करण्याबद्दल, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल, स्थानिक सरकार किंवा इन्स्पेक्टर जनरल आफ् प्रिझन्स् यांकडून हुकूम असण्याची जरूरी नाहीं.

पोलीसच्या नजरेखालीं असणाऱ्या मनुष्यांबाबद रिपोर्ट.
[१८७१ चा आक्ट २७, क. २१ पहा.]

१९. सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाचें कलम ४९, रकम (ड), या नंतर पुढील रकमा दाखल कराव्या; त्या येणेंप्रमाणें :—

"(इ) पोलीसच्या नजरेखालीं असणारा जो कोणी मनुष्य सदरहू गांवांत रहात असेल त्यानें, सन १८९३ चा अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्यांबाबद आक्ट, याच्या १२ व्या कलमाअन्वयें केलेली कोणतीही कानू तोडल्याची गोष्ट;

(फ) असा कोणताही मनुष्य परवानगीवांचून रात्रीच्या वेळीं गैरहजर असल्याची, किंवा तो वईट चालीच्या मनुष्यांच्या संगतींत असल्याची, किंवा त्यानें मशागत करण्याचें किंवा सचोटीच्या साधनांनीं उपजीविका करण्याचें बंद केल्याची गोष्ट;

(ग) असा कोणी मनुष्य परवानगीवांचून सदरहू गांवांतून गेल्याची गोष्ट;

[सन १८८२ चा आक्ट १०, क. ४५ (ब) पहा.]

(ह) जो कोणी मनुष्य पोलीसच्या नजरेखालीं आहे असें त्यास माहीत असेल किंवा वाजवी रीतीनें वाटेल असा मनुष्य परवानगीवांचून सदरहू गांवांत आल्याची गोष्ट;

(ऐ) ज्या कोणा मनुष्यास उपजीविकेचें कांहीं दिसतें साधन नाहीं किंवा ज्याच्यानें आपल्या ठावठिकाणाविषयीं खातरीलायक मजकूर सांगवत नाहीं असा मनुष्य त्या गांवांत आल्याची किंवा त्यांत त्याची वस्ती असल्याची गोष्ट."

[१८८२ चा आक्ट १०, क. ३४९ पहा.]

१६. सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाचें कलम ३४८ याच्याबदला पुढील कलम दाखल करावें; तें येणेंप्रमाणें :—

नाणें पाडणें, स्टांपाचा कायदा किंवा माल यांविरुद्ध अपराध शाबीत झाल्याचे ठराव ज्या मनुष्यांविषयीं पूर्वीं झाले असतील त्यांचा इनसाफ.

"३४८. सन १८९३ चा अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्यांबाबद आक्ट, याच्या ९ व्या कलमाअन्वयें, अपराध करण्याची सवय असलेला मनुष्य ह्मणून ज्याविषयीं ठराव झाला असेल, किंवा ज्याविषयीं हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या १२ व्या किंवा १७ व्या बाबीअन्वयें तीन किंवा त्यांहून जास्त वर्षांच्या मुदतीची कैदेची शिक्षा होण्याजोगा अपराध केल्याच्या शाबितीचा ठराव झाला असेल, अशा कोणा मनुष्यावर सदरहू दोहोंपैकीं कोणत्याही एका बाबीअन्वयें तीन किंवा त्याहून जास्त वर्षांच्या मुदतीची कैदेची शिक्षा होण्याजोग्या कोणत्याही अपराधाचा आरोप ठेवण्यांत आला असून तो हुकुमत असणाऱ्या ज्या माजिस्ट्रेटापुढें ठेवण्यांत आला त्या माजिस्ट्रेटास, फिर्यादीतर्फेचा व आरोपिताच्या तर्फेचा साक्षीपुरावा ऐकून घेतल्यावर, आरोपित मनुष्य अपराधी आहे, आणि अपराध करण्याची सवय असल्याबदल किंवा अपराधाची शाबिती झाल्याबदल त्याविषयीं सदरहूप्रमाण ठराव झाला असल्याकारणानें त्याला, आपणास जी शिक्षा देण्याचा अधिकार आहे तिच्याहून जास्त कडक शिक्षा मिळाली पाहिजे असें जेव्हां वाटेल, तेव्हां त्यानें तें आपलें मत लिहून ठेवावें, आणि आपण चालविलेल्या कामाचे कागद सेशन कोर्टाकडे पाठवून देऊन त्या आरोपितासही त्या कोर्टाकडे रवाना करावा.

"अशा सेशन कोर्टास योग्य वाटेल तर तें कोर्ट, पक्षकारांस तपासण्यास व त्या खटल्यांत ज्याची पूर्वीं साक्ष झाली आहे अशा कोणत्याही साक्षीदारास पुनः बोलावून तपासण्यास आणि जास्त पुरावा मागवून घेण्यास मुखत्यार आहे; आणि त्यानें त्या खटल्यांत, त्यास योग्य वाटेल व कायदेशीर असेल असा फैसला, शिक्षा किंवा हुकूम केला पाहिजे."

सन १८८२ चा आक्ट १०, कलम ३४९ याची सुधारणा.

१७. सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाचें कलम ३४९ याच्या विशेष ठरावांत, "कलमें ३२ व ३३" या शब्दांच्या व अंकांच्या बदला, "कलमें ३२, ३३ व ३४" हे शब्द व अंक दाखल करावे.

हे कोर्टांचे तपासणीसंबंधी अधिकार.

१८. सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाचें कलम ४३९ याच्या तिसऱ्या पारिग्राफाबद्दल पुढील मजकूर दाखल करावा ; तो येणेंप्रमाणें :—

"या कलमाअन्वयें कोणत्याही शिक्षेच्या संबंधानें विचार करतांना सदरहू कोर्टास, त्याच्या मतें आरोपितानें जो अपराध केला त्याबद्दल, जर असा अपराध त्यापुढें प्रथम इन्साफ करतां येण्याजोगा असून त्याचा इन्साफ त्यापुढें झाला असता तर त्यानें जी कोणतीही शिक्षा दिली असती, ती शिक्षा देण्याचा अधिकार आहे."

मालाविरुद्ध कित्येक वर्गांचे अपराध केल्यामुळें झालेल्या नुकसानीबद्दल मोबदला देवविण्याचा अधिकार.

१९. (१) जेव्हां जेव्हां स्थानिक सरकारास असें दिसून येईल कीं—

(अ) कोणत्याही प्रदेशांत, हिंदुस्थानच्या पीनल कोडाचें कलम ४२७, ४२८, ४२९, ४३५ किंवा ४३६, याविरुद्ध पुष्कळ अपराध करण्यांत येत आहेत किंवा हे किंवा यांपैकीं कोणतेही अपराध करण्याच्या इराद्यानें वारंवार संगनमतांचे बेत होत आहेत, आणि त्या प्रदेशांतील रहिवाशांस, किंवा त्यांपैकीं एका किंवा अनेक मोठ्या वर्गांतील मनुष्यांस, अपराध्यांचा किंवा संगनमत करणारांचा पत्ता लागण्याजोगी जी माहिती मिळाली असेल ती न देण्याबद्दल त्यांनीं कट केला आहे, किंवा

(ब) कोणत्याही प्रदेशांत, त्याच कोडाचें कलम ३९५ किंवा ४०० याविरुद्ध पुष्कळ अपराध किंवा गुरांच्या चोऱ्या एका जथावळींतील कोणा एका किंवा अनेक असामींकडून करण्यांत येत असून, त्या जथावळींतील लोकांस अपराध्याचा किंवा अपराध्यांचा पत्ता लागण्याजोगी जी माहिती मिळाली असेल ती न देण्याबद्दल त्यांनीं कट केला आहे,

तेव्हां तेव्हां त्या सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वीं मंजुरी घेऊन, या कलमाचे ठराव सदरहू प्रदेशास जाहिरनाम्याच्या द्वारें लागू करण्याचा अधिकार आहे.

(२) असा दरेक जाहिरनामा सरकारी गॅझेटांत व स्थानिक सरकार फर्मावील तशा इतर रीतीनें प्रसिद्ध केला पाहिजे.

(३) असा कोणताही जाहिरनामा ज्या प्रदेशास लागू असेल त्या प्रदेशाच्या हद्दी त्या जाहिरनाम्यांत मुकरर केल्या पाहिजेत.

(४) स्थानिक सरकारास असा कोणताही जाहिरनामा रद्द करण्याचा, किंवा तो ज्या प्रदेशास लागू असेल त्या प्रदेशाच्या हद्दींची इयत्ता कमी करण्याचा किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वीं मंजुरी घेऊन, अशी इयत्ता वाढविण्याचा अधिकार आहे.

(५) जेव्हां पोटकलम (१) यांत सांगितल्याप्रकारचा कोणताही अपराध हें कलम लागू असणाऱ्या कोणत्याही प्रदेशांत केलेला असून, वर सांगितल्याप्रकारचा कट झाला असल्याकारणानें अपराध्याचा पत्ता लागूं शकत नाहीं अशी, तो केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या मुदतीनंतर जिल्हा माजिस्ट्रेटाची खातरी होईल, तेव्हां त्यास—

(अ) अशा अपराधामुळें ज्या मनुष्यांची नुकसानी झाली त्यांस तिच्या मोबदल्याबद्दल अमुक रकम द्यावी असा ठराव करण्याचा,

(ब) याप्रमाणें ठरविलेली रकम कोणत्या गांवच्या किंवा गांवांच्या रहिवाशांनीं, किंवा कोणत्या मनुष्यांनीं, किंवा कोणत्या एका किंवा

अनेक वर्गांतील मनुष्यांनीं द्यावयाची त्याचा निर्णय करून हुकूम करण्याचा, आणि

(क) अशा दरेक रहिवाशाची किंवा मनुष्याची जी ऐपत असल्याचें त्यास वाटेल त्याप्रमाणें त्या दरेक असामीनें सदरहू रकम कोणत्या हिसेरसीनें द्यावी त्याबाबद हुकूम करण्याचा,

अधिकार आहे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, सदरहू माजिस्ट्रेट ज्या कोणत्याही मनुष्याचा किंवा कोणत्याही वर्गांतील मनुष्यांचा सदरहू अपराधाशीं संबंध नसल्याविषयीं सदरील हुकुमांत ठराव करील त्या मनुष्याकडून किंवा त्या वर्गांतील मनुष्यांकडून सदरहूप्रमाणें ठरविलेल्या मोबदल्याच्या रकमेपैकीं कोणताही अंश घ्यावयाचा नाहीं.

(६) पोटकलम (५) अन्वयें मोबदल्याची रकम देवविण्याबाबद केलेला कोणताही ठराव किंवा त्या पोटकलमाअन्वयें केलेला कोणताही हुकुम, भागाच्या कमिशनराकडून किंवा जेथें असा कमिशनर नसेल तेथें स्थानिक सरकाराकडून बहाल करण्यांत येई तोंपर्यंत, अमलांत येणार नाहीं.

(७) जेव्हां सदरहूप्रमाणें ठरविलेली हिसेरसी पोटकलम (६) अन्वयें बहाल करण्यांत येईल तेव्हां तिची रकम, जिल्हा माजिस्ट्रेटाच्या वारंटावरून, सन १८८२च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाचीं कलमें ३८६ व ३८७ यांत दंड वसूल करण्याबद्दल जी रीति सांगितली आहे त्या रीतीनें वसूल करण्याचा अधिकार आहे.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

प्रस्तुत मसुद्याचा मुख्य उद्देश ह्मटला ह्मणजे, अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्यांवर हल्लींपेक्षां विशेष चांगली नजर ठेवण्याविषयीं बंदोबस्त करावा व याच्या योगानें पोलिसास अशा मनुष्यांला निर्बंधांत ठेवतां येऊन गुन्ह्याचा मोड व्हावा, हा आहे. या संबंधानें हा मसुदा, सन १८७१ चा गुन्ह्यांचा प्रतिबंध करण्याबाबद आक्ट (३४ व ३५ व्हिक्टो., चा. ११२), याच्या ८ व्या कलमाच्या आधारानें तयार केला आहे, कारण त्या कलमांतील ठराव अमलांत आल्यापासून सदरील उद्देश इंग्लंड देशांत उत्तम प्रकारें सिद्धीस गेला असल्याचें समजतें.

२. या मसुद्याचे ठराव तपशीलवार घेतले असतां, ते पुढीलप्रमाणें चार सदरांखालीं येतात:—

(१) चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण घेण्याबाबदच्या कायद्याची सुधारणा (कलमें २ तें ४);

(२) ज्यांविषयीं अपराधाच्या शाबितीचा ठराव झाला आहे अशा मनुष्यांस, कायद्याप्रमाणें काम चालून, अपराध करण्याची सवय असलेले मनुष्य ह्मणून ठरविल्यावर त्यांवर नजर ठेवणें (कलमें ५ ते १५);

(३) अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्यांच्या इन्साफाबाबद व त्यांस वाजवी शिक्षा मिळण्याबाबद काम चालविण्याच्या रीतींत फेरफार (कलमें १६ ते १८);

(४) मालविरुद्ध कित्येक प्रकारचे अपराध ज्या प्रदेशांत होत असतील तेथील रहिवाशांकडून नुकसानीबद्दल मोबदला देववून त्या अपराधांचा मोड करणें (कलम १९).

३. **कलम २.**—या कलमावरून माजिस्ट्रेटांस, ज्या मनुष्यांस (१) चोरांचा बचाव करण्याची किंवा त्यांस आश्रय देण्याची, किंवा चोरीचा माल लपविण्याच्या किंवा त्याचा निकाल लावण्याच्या कामीं मदत करण्याची सवय आहे, किंवा (२) अपक्रिया करण्याची सवय आहे, किंवा (३) ते इतक्या धाडशी व भयंकर स्वभावाचे आहेत कीं त्यांस तारणावांचून मोकळें राहूं देणें हें लोकांस धोक्याचें आहे, अशा मनुष्यांनीं चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण देण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार दिला आहे.

४. **कलमें ३ व ४.**—या कलमांवरून माजिस्ट्रेटांस, चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण देण्याविषयीं हुकूम करण्याच्या ऐवजीं, पराकाष्ठा तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार आहे.

९. **कलमें ५ ते १५.**—कलमें ६ ते १९ यांमध्यें, " अपराध करण्याची सवय असलेले मनुष्य " ह्मणून ज्यांविषयीं कलम ९ अन्वयें ठराव झाला असेल त्या मनुष्यांस पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याच्या संबंधाचे ठराव दिले आहेत. ९व्या कलमाअन्वयें ठराव करण्याला, हिंदुस्थानच्या पीनल कोडाची बाब १२ किंवा १७, याअन्वयें अपराधाच्या शाबितीचे दोन ठराव होणें अवश्य आहे; याखेरीज आणखी त्या कलमाअन्वयें कोणताही ठराव करण्यापूर्वीं कोर्टाची किंवा माजिस्ट्रेटाची, आरोपितास गुन्हा करण्याची सवय आहे किंवा गुन्हा करणें हें त्याचें उपजीविकेचें साधन बनून राहिलें आहे, अशी हजर केलेल्या पुराव्यावरून खातरी होणेंही जरूर आहे.

कोणत्याही मनुष्यास पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याची परमावधीची मुदत, इंग्लंड देशाच्या सदरहू आक्टाप्रमाणें मुख्य शिक्षा संपल्याच्या तारखेपासून सात वर्षांची, ठरविली आहे; आणि पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याबाबदचे हुकूम ज्या मुख्य शिक्षेस जोडले असतील, त्या शिक्षेचा ते भाग असल्याप्रमाणेंच त्यांच्या संबंधानें अपिलाचा व तपासणीचा हक्क असल्याविषयीं ठराव केला आहे.

तसेंच माजिस्ट्रेटांस, पोलीसच्या नजरेऐवजीं चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण कबूल करण्याचा, आणि पोलीसच्या नजरेखालीं ठेवण्याबाबदचे हुकूम निर्भयपणें रद्द करतां येण्यासारखे असतील तेव्हां ते रद्द करण्याचा अधिकार दिला आहे.

६. **कलम १६.**—या कलमावरून, अपराध करण्याची सवय असलेल्या मनुष्यांच्या इन्साफाचें काम चालविण्याच्या रीतींत फक्त एकाच जागीं फेरफार करण्याचें योजिलें असून तो, सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या ३४८ व्या कलमाची त्या कोडाच्या ३४९ व्या कलमाच्या धोरणानें सुधारणा करणें, हा होय. कलम ३४८ यांत असा ठराव आहे कीं, पीनल कोडाची बाब १२ किंवा १७ अन्वयें शिक्षा होण्याजोग्या अपराधाच्या शाबितीचा ठराव ज्या मनुष्याविषयीं झालेला आहे, अशा मनुष्यावर पुनः सदरहू प्रकारच्या अपराधाचा आरोप ठेवण्यांत येईल तेव्हां, ज्या माजिस्ट्रेटापुढें त्यावर असा आरोप ठेविला त्या माजिस्ट्रेटास तो अपराध करण्याची सवय असलेला मनुष्य आहे असें वाटल्यास, त्या मनुष्याला सामान्यतः सेशन कोर्टाकडे पाठविलें पाहिजे. प्रस्तुत मसुद्याच्या १६ व्या कलमावरून माजिस्ट्रेटास अशा बाबतींत आरोप आलेल्या अपराधाचा स्वतः इन्साफ करण्याचा व अपराधाच्या शाबितीचा ठराव करून तो खटला सेशन कोर्टाकडे शिक्षा देण्याकरितां पाठविण्याचा अधिकार दिला आहे, आणि त्यांत अशा कोर्टास योग्य वाटेल ती जास्त चौकशी करण्याचें किंवा ती करण्याविषयीं हुकूम फर्माविण्याचें त्या कोर्टाच्या नजरेवर ठेविलें आहे.

७. **कलम १९.**—या कलमामध्यें, मालाविरुद्ध अपराध घडत असल्याचा थांग अमुक एका प्रदेशांत लागत असून, अपराध्यांचा पत्ता लागण्याजोगी तेथील रहिवाशांस कळलेली माहिती न देण्याविषयीं त्यांमध्यें कट झाला असल्याकारणानें, कोणते मनुष्य अपराधी होत हें मुकरर करतां येत नसेल, त्याप्रसंगीं तशा अपराधांचा मोड करण्याच्या संबंधाचे ठराव दिले आहेत. अशा बाबतींमध्यें माजिस्ट्रेटास, सदरहू प्रदेशांतलि ज्या मनुष्यांचा किंवा ज्या वर्गांमधील मनुष्यांचा सदरलि अपराधाशीं मुळींच संबंध नसल्याचें त्यास वाटेल त्यांस सोडून, त्या प्रदेशांतल्या एकंदर रहिवाशांवर नुकसानीच्या मोबदल्याची रकम आकारण्याचा अधिकार दिला आहे.

तारीख १२ माहे जानेवारी, सन १८९३.

**फिल. पी. हचिन्स.**

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.